उप आयुक्त (झोनिपु) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :-अति.मआ(इ)/झोनिपु३/१२२२
दिनांक :- २८/११/१४

मा. सर्व खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.

## कार्यालयीन परित्रक

**विषय :- मा.विधानसभा/ विधानपरीषद अधिवेशन काळात बारनिशी कार्यालयीन वेळेनंतर सुरू ठेवणे बाबत.**

मा. महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरीषदेचे अधिवेशन दिनांक ०८/१२/२०१४ पासुन सुरू होत आहे. मा. विधानसभा/ विधानपरीषदेत चर्चेला घेतले जाणारे तारांकित प्रश्न/ अतारांकित प्रश्न/ औचित्याचा मुद्दा / कपात सुचना/ अर्धातास चर्चा/ लक्षवेधी सुचना इत्यादी प्रश्न हे बहुतेक वेळा कार्यालयीन वेळेनंतर मंत्रालयातुन फॅक्स किंवा ई-मेल द्वारे पाठविले जातात सदर प्रश्नांची पुर्तता शासनाकडे तात्काळ करणे आवश्यक असते. उपआयुक्त झोनिपु कार्यालय समन्वयक म्हणुन कामकाज पहात असल्यामुळे कार्यालयीन वेळेनंतर मंत्रालयाकडुन प्रश्न प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयाकडे पुर्तता करणे साठी पाठविणे गरजेचे असते.

तरी सर्व खातेप्रमुख यांनी आपल्या कार्यालयाकडील आवक - जावक बारनिशी दिनांक ०१/१२/२०१४ पासुन ते अधिवेशन संपेपर्यंत या कालावधीत सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात यावी व आपल्या विभागातील विधानसभा / विधानपरीषद प्रश्नांच्या संदर्भात कामकाज पहाणाऱ्या सेवकांना आवश्यक ते आदेश देण्यात यावेत. काही वेळेस प्रश्न आपल्या कार्यालयाशी संबंधित नसतील तर समन्वयक उपआयुक्त झोनिपु कार्यालयाकडे ई-मेल द्वारे (dmore@punecorporation.org) किंवा दुरध्वनी द्वारे (०२०-२५५०१२७९) वर तातडीने कळविण्यात यावे. तसेच महानगरपालिके कडे प्राप्त होणारे तारांकित प्रश्न/ अतारांकित प्रश्न/ औचित्याचा मुद्दा / कपात सुचना/ अर्धातास चर्चा/ लक्षवेधी सुचना इत्यादी प्राप्त झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत १ दिवसांच्या आत पुर्तता करून उत्तरे/ अहवाल महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने मा.आयुक्तांच्या स्वाक्षरीने शासनाकडे अनुपालनासाठी पाठवावा. मा.विधानसभा/विधानपरीषदेचे कामकाज प्रथम प्राधान्याने व तातडीने करावे. सर्व खातेप्रमुखांनी आपले पुर्तता/ मुख्यालय अविरत चालू ठेवावे.

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेटस्)
पुणे महानगरपालिका.

प्रत माहितीसाठी

१) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका

२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका